॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572

**OFFICE OF THE DIRECTOR OF EXAMINATIONS & EVALUATION**

website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215294

E-mail: directorboee@srtmun.ac.in

जा.क्र. परीक्षा/समन्वय/२०२२-२३/१८२४ दिनांक : २८/११/२०२२

## हिवाळी-२०२२ परीक्षेसंबंधी महत्वाचे परिपत्रक

**प्रति,**
**मा.प्राचार्य/केंद्रप्रमुख**
सर्व संलग्नि महाविद्यालय,
हिवाळी-२०२२ परीक्षा, प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय: हिवाळी-२०२२ परीक्षेतील केंद्रप्रमुख व सहकेंद्रप्रमुख यांच्या कार्यपध्दतीबाबत.**

महोदय,

सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य/परिसंस्थाचे संचालक तसेच सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, हिवाळी-२०२२ मध्ये होणा-या सर्व पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा दिनांक ०१/१२/२०२२, १३/१२/२०२२ व पद्व्युत्तर व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा दिनांक २६/१२/२०२२ पासून सुरु होत आहेत. तसेच सर्व विषयाच्या प्रश्नपत्रिका Download करणे व त्या संबंधी करावयाची पुढील सर्व संबंधीत कामाबाबत खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत. या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक व क्रम:प्राप्त आहे.

| | |
|---|---|
| ०१ | प्राचार्य आणि केंद्रप्रमुखांनी ऑनलाईन पध्दतीने **परीक्षेसाठी माहिती भरत असतांना फक्त प्राचार्य आणि केंद्रप्रमुखांनीच माहिती भरणे बंधनकारक राहील.** महाविद्यालयातील इतर कोणत्याही कर्मचा-यांची माहिती किंवा दूरध्वनी नंबर भरुन दिल्यास किंवा तसे निदर्शनास आल्यास तथा काही गैरप्रकार आढळल्यास त्यास संबंधीत प्राचार्य आणि केंद्रप्रमुख जबाबदार राहील, याची सर्व महाविद्यालयांनी गांभीर्याने नोंद घ्यावी. तसेच या संदर्भात काही गैरप्रकार आढळल्यास विद्यापीठामार्फत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. |
| ०२ | सकाळी ७.३० ते ९.०० आणि **दुपारी १२.०० ते २.०० या** वेळेमध्येच विषय निहाय प्रश्नपत्रिका Download करणे बंधनकारक आहे. सकाळी ९.०० वाजता आणि दुपारी २.०० वाजता प्रश्पत्रिकेची लिंक बंद करण्यात येईल, लिंक बंद झाल्यानंतर पुन्हा चालू होणार नाही. याची सर्व परीक्षा केंद्रावरील सर्व संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी. |
| ०३ | प्रश्नपत्रिका Download करीत असतांना **(Laptop) चा उपयोग करु नये.** फक्त सीपीयु आणि मॉनिटरचा उपयोग करुन व वेब कॅमेरा चालू ठेऊन प्रश्नपत्रिका Download करण्यात यावी. महाविद्यालयात ज्या ठिकाणी गोपनीय कक्ष आहे, त्या ठिकाणी प्रश्नपत्रिका Download करण्यात यावी, व **त्या ठिकाणी वेब कॅमेरा (CCTV) बसविणे बंधनकारक आहे.** |
| ०४ | वरील दर्शविलेल्या वेळेप्रमाणेच विद्यापीठाने जे परीक्षा केंद्र नेमुन दिलेले आहेत, अशा परीक्षा केंद्रांनी परीक्षार्थीच्या प्रवेशपत्रावरील विषयाप्रमाणेच प्रश्नपत्रिका Download करुन घेणे बंधनकारक आहे. |
| ०५ | ज्या अभ्यासक्रम विषयांच्या (कोड क्रमांकाच्या) प्रश्नपत्रिका Download केल्या आहेत त्याची काटेकोरपणे नोंद वहीत नोंद घेणे बंधनकारक आहे. प्रश्नपत्रिका Download केल्यानंतर प्रश्नपत्रिकांची सर्व पाने उपलब्ध असल्याचीही खात्री करुन घ्यावी व आवश्यक तेवढयाच छायांकित (Photocopy) प्रती करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत केंद्रप्रमुखाची राहील. दररोज किती विषयांच्या प्रश्नपत्रिका छायांकित (Photocopy) प्रती काढल्या आहेत, त्या प्रत्येक विषयाच्या कोड नंबर प्रश्नपत्रिकेच्या नोंदी दररोज नोंद पुस्तिकेत घेवून हिशोब ठेवणे बंधनकारक आहे. |

| | |
|---|---|
| ०६ | प्रश्नपत्रिका Download केल्यानंतर केंद्रप्रमुख, सहकेंद्रप्रमुख यांनी परीक्षा सुरू होण्यापूर्वी सदर प्रश्नपत्रिका बरोबर असल्याबाबत खात्री करावी उदा. प्रश्नपत्रिकेवर दिलेला कोड नंबर /वर्ग /विषय /वेळ / पेपर क्रमांक /पेपरचे पुर्ण नांव / व दिनांक या बाबी वेळापत्रकाशी पडताळून पाहाव्यात. खात्री झाल्यानंतरच छायांकित (Photocopy) प्रती करून परीक्षा दालनात बंद लिफाफ्यात पर्यवेक्षकाकडे पाठविण्यात याव्यात. |
| ०७ | प्रश्नपत्रिका Download करेपर्यंत गोपनीय कक्षामध्ये केंद्रप्रमुखांनी व सहकेंद्रप्रमुखांनी उपस्थित राहावे व त्यांच्या देखरेखीखालीच छायांकित प्रती काढण्याचे (Photocopy) चे काम करण्यात यावे. सदर गोपनीय कक्षामध्ये केंद्रप्रमुखांनी नेमुन दिलेल्या कर्मचा-यांकडून गोपनीयता राखणे बाबतचे हमीपत्र घेण्यात यावे व नेमुन दिलेल्या कर्मचा-या व्यतिरिक्त इतरांना गोपनीय कक्षामध्ये प्रवेशास सक्त मनाई करावी. |
| ०८ | महाविद्यालयामध्ये ज्या ठिकाणी गोपनीय कक्ष आहे, त्या ठिकाणी परीक्षा संपेपर्यंत दररोज (CCTV) कॅमेरेचे फुटेजची नोंद ठेवणे बंधनकारक राहील. गोपनीय कक्षाच्या परिसरातही (CCTV) कॅमेरे बसविणे बंधनकारक राहील. (CCTV) कॅमे-यामध्ये दररोज नोंद न झाल्यास विद्यापीठामार्फत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. |
| ०९ | (CCTV) कॅमे-याची तपासणी प्राचार्य/केंद्रप्रमुख यांच्या देखरेखीत करण्यात यावी. विद्यापीठामार्फत केव्हांही परीक्षा केंद्राचे फुटेज (Videos) मागविण्यात येतील, अथवा तपासणी केली जाईल. |
| १० | परीक्षा सुरू होण्यापूर्वी व परीक्षा सुरू झाल्यानंतर केंव्हाही विद्यापीठातील अधिकारी/कर्मचारी व दक्षता पथकातील सदस्य इत्यादी परीक्षा केंद्राना आकस्मिक भेटी देतील व केंद्रावरील व्यवस्थापनाचे निरीक्षण करतील. |
| ११ | परीक्षा काळात, परीक्षेसाठी लागणा-या प्रश्न पत्रिका Download करण्यासाठी विजेची उपलब्धता ठेवण्याची कटाक्षाने दक्षता घ्यावी. सदर प्रश्नपत्रिका Download करते वेळेस अचानक विद्युत पुरवठा खंडीत झाल्यास त्यासाठी महाविद्यालयांनी इन्व्हरटर, जनरेटर इत्यादीची व्यवस्था अगोदरच तयार ठेवावी, जेणे करून प्रश्नपत्रिका डाऊनलोड करतेवेळी अडचणी येणार नाहीत. |
| १२ | परीक्षा काळात परीक्षा केंद्रांना ग्रामस्थ, पत्रकार, छायाचित्रकार, लोकप्रतिनीधी, पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते यांना भेटी देण्याची परवानगी नाही. त्यांना परीक्षा दालनात प्रवेश देवू नये. अशा व्यक्ती परीक्षा केंद्रावर आल्यास त्यांना सौजन्याने योग्य प्रकारे नियमांची व जबाबदारीची जाणीव करून द्यावी. |
| १३ | महाविद्यालयास पाठविण्यात येणा-या प्रश्नपत्रिका कक्षामध्ये अत्यंत महत्वाच्या कामासाठी फक्त केंद्रप्रमुखांनाच अथवा त्यांनी ज्यांना अधिकारी दिलेले आहेत त्यांनाच प्रवेश देण्यात यावा. परीक्षेच्या गोपनीय कक्षात साधा मोबाईल वापरण्याची परवानगी राहील तेथे इतर कोणाताही Android / Smartphone व तत्सम प्रकारच्या मोबाईलचा वापर करता येणार नाही. याची सर्व जबाबदारी केंद्रप्रमुखाची राहील. |
| १४ | परीक्षा सुरू झाल्यावर पहिल्या तीस (३० मि.) मिनिटानंतर परीक्षा केंद्रावर कोणत्याही विद्यार्थ्यास कोणत्याही सबबीवर परीक्षा दालनामध्ये प्रवेश देऊ नये, वेळेवर न पोहचण्याचे सबळ कारण असल्यास विद्यापीठाशी विचारविनिमय करून निर्णय घ्यावा. |
| १५ | एखादा विद्यार्थी अर्धा /एक तासापूर्वी परीक्षा केंद्र सोडत असल्यास त्याच्याकडून उत्तरपुस्तिका व प्रश्नपत्रिका हस्तगत करूनच परीक्षा दालनाबाहेर सोडण्यात यावे. |
| १६ | प्रश्नपत्रिका download करणे, छायांकित प्रती काढणे, इत्यादी कामे तसेच महाविद्यालयास पाठविण्यात येणा-या प्रश्नपत्रिका इत्यादी कामे केंद्रप्रमुख व सहकेंद्रप्रमुख यांच्या उपस्थितीत करण्यात यावीत. |
| १७ | Online प्रश्नपत्रिका वितरणा संदर्भात काही समस्या असल्यास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.<br>8668784502, 9923409491, 9881340727 |

उपरोक्त सूचनांचे सर्व संबंधीतांनी काटेकोरपणे पालन करून परीक्षा सूरळीत पार पाडण्यासाठी सर्व संबंधीतांनी सहकार्य करावे, ही विनंती.

**डॉ. दिगंबर नेटके**
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ